# Maharashtra Bamboo Promotion Foundation

MBPF

(Certificate of Incorporation U85100MH2019NPL323751)

(Promoted by Government of Maharashtra and Tata Trusts)

Address: No.7, 2nd floor, 554, Jonette CHS Ltd., Jame Jamshed Rd., Matunga, Mumbai-400019.

Ph : 022-24167549. Website: www.mahabamboofoundation.org Email: mahabamboofoundation@gmail.com


दि. १७/०६/२०२३

## परिपत्रक

बांबू रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग सेंटर BRTC चंद्रपूर येथे येत्या जुलै २०२३ पासून 'बांबू तंत्रशास्त्र पदवीका' प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होत आहे. हा अभ्यासक्रम ३ सत्रांमध्ये (१८ महिन्यांच्या कालावधीकरीता) असेल किमान पात्रता १०वी पास असेल. पाच वर्षापूर्वी BRTC येथे हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला होता. येथून अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांनी बांबू व्यवसायात नोकरी अथवा स्वत:चा व्यवसाय सुरू केलला आहे. या अभ्यासक्रमाचे पदवीका प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ(MSBTE) कडून देण्यात येईल. या अभ्यासक्रमासाठी अर्धवार्षिक शुल्क रू. ३,०००/—(अक्षरी रूपये तीन हजार फक्त) इतके आहे. संपूर्ण अभ्यासक्रमाचे शुल्क रू. ९,०००/— (अक्षरी रूपये नऊ हजार फक्त) इतके आहे. विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था मोफत करण्यात येईल.

महाराष्ट्र व इतर राज्यात बांबू क्षेत्रातल्या कुशल कारगीरांची प्रचंड मागणी आहे. त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हयातील विद्यार्थ्यांनी सदर अभ्यासक्रमाकरीता नोंदणी करावी याकरीता 'महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान'तर्फे विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील १० विद्यार्थी | प्रत्येक सत्राचे अभ्यासक्रम शुल्क रू. ३०००/— |
| ब) | राज्यातील इतर जिल्हयातील १० विद्यार्थी | प्रत्येक सत्राचे अभ्यासक्रम शुल्क रू. ३०००/— अधिक इतर खर्चाकरीता प्रत्येक सत्राकरीता रू. ३०००/— असे एकुण प्रत्येक सत्राकरीता रू. ६०००/—. |

बांबू क्षेत्रातील उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, कारागीर यांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांच्या परिचयातील इच्छूक विद्यार्थ्यांना याबद्दल माहिती द्यावी ज्यायोगे त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा आपल्या उद्योगाला व पर्यायाने बांबू क्षेत्राला चालना मिळेल.

आपला विश्वासू,

वि. गिरिराज

वि. गिरिराज, भाप्रसे(नि.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
(भ्र.क्र.) ९८२१९३७५४९